# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२४-२५/१७

**परिपत्रक :-**

विषय : मुंबई विद्यापीठाशी संबंधीत सिनेट सदस्य, पालक, विद्यार्थी, विविध विद्यार्थी संघटना इत्यादींकडुन प्राप्त तक्रारींबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत...

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, समन्वयक/संचालक, ठाणे उपकेंद्र, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व स्थायी/अस्थायी शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठात विविध कारणास्तव विभिन्न विभागात अनेकदा सिनेट सदस्य, पालक, विद्यार्थी, महाविद्यालयीन कर्मचारी/शिक्षक /व्यवस्थापन प्रतिनिधी व विविध संघटना कार्यालयीन कामकाज, समस्या व विविध तक्रारींच्या अनुषंगाने भेटी देत असतात त्यामुळे विद्यापीठातील विशेष करुन परीक्षा विभाग, नावनोंदणी व पात्रता विभाग, महाविद्यालय संलग्नता व मान्यता विभाग, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग इ. मध्ये गर्दी होत असते. त्यामुळे कार्यालयीन वेळेचा अपव्यय होत असतो व संबंधित व्यक्ती ज्या कामासाठी आला आहे ते होण्यासही विलंब होतो व त्यामुळे कधीकधी संबंधीत व्यक्ती व कर्मचारी यांना मानसीक त्रासास सामोरे जावे लागू शकते. हे सर्व टाळण्यासाठी व प्राप्त तक्रारींबाबत वेळेत निपटारा करण्यासाठी संबंधीत विभागांनी पुढीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी :

1) आपापल्या विभागाची जास्तीत जास्त कामे ऑनलाईन पध्दतीने करुन विद्यार्थी व महाविद्यालये यांना सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
2) सिनेट सदस्य, पालक, विद्यार्थी, महाविद्यालयीन कर्मचारी/शिक्षक/व्यवस्थापन प्रतिनिधी व विविध संघटना यांच्याकडुन प्राप्त कामे/तक्रारी यांचा ऑनलाईन पद्धतीने जलद गतीने निपटारा करण्यात यावे.
3) सिनेट सदस्य, पालक, विद्यार्थी, महाविद्यालयीन कर्मचारी/शिक्षक/ व्यवस्थापन प्रतिनिधी व विविध संघटना यांनी विभागास भेट दिल्यास त्यांच्याशी सौजन्याने वागावे.

सदर बाब संबंधित कार्यालय प्रमुख यांनी वरीलप्रमाणे उचित कार्यवाही करुन आपल्या अधिनस्त कर्मचा-यांच्या निदर्शनास आणू द्यावी.

दिनांक : ३ जानेवारी, २०२५
मुंबई - ४०० ०३२

( डॉ. प्रसाद कारंडे )
कुलसचिव

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

1) विद्यापीठाच्या फोर्ट परिसरातील विविध विभाग/कक्षांचे प्रमुख, कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, उपकुलसचिव/सहायक कुलसचिव व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व स्थायी/अस्थायी शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी
2) स्वीय सहायक : 1) कुलगुरु 2) प्र-कुलगुरु 3) कुलसचिव